732-738

# उपविभागीय अधिकारी,भोकर यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| ई मेल sdobhokar@gmail.com | दुरध्वनी क्रमांक 02467-223884 |
| क्र.2016/म-2/भूसं/एलएनक्यू/उविअभो/प्र.क्र.01 | दिनांक 13 .04.2018 |

प्रति,

व्यवस्थापक,

शासकिय मुद्रणालय, औरंगाबाद

टो.नं.08
16/04/2018

विषयः- भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 भूसंपादन प्रस्ताव मौजे मुदखेड रस्त्याच्या वळण रस्त्यासाठी (रा.मा.क्र.44) मौ.मुदखेड ता.मुदखेड

भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 मधील कलम 11(1) ची अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दीकरीता Page Maker 7.00 मधील सॉफ्ट कॉपी पेन ड्राईव्हसह सादर करण्यात येत आहे.

तरी सदरील अनुसुची, कलम 11(1) ची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्दी देण्यात येवून राजपत्राची प्रत या कार्यालयास त्वरीत पाठविण्यात यावी ही विनंती.

सहपत्रः-वरिलप्रमाणे

13/04/18

उपविभागीय अधिकारी,
भोकर

प्रतिलिपी,

1. मा.जिल्हाधिकारी(भूसंपादन)नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.नांदेड यांना माहितीस्तव..
3. जिल्हा माहिती अधिकारी,नांदेड यांना कलम 11(1) ची अधिसुचना व अनुसुची 3 प्रतीत यासोबत देण्यात येते. तरी त्यास 2 स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून तसे या कार्यालयास अवगत करावे.
4. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांना कलम 11(1)ची अधिसूचना व अनुसुचीची 1 प्रत देण्यात येवून विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना व अनूसुची जिल्ह्याच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावी व तसे या कार्यालयास अवगत करावे.
5. तलाठी मौ.मुदखेड यांना कलम 11(1) ची अधिसुचना व अनुसुची 6 प्रतीत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदर अधिसुचना व अनुसुची मा.जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड, तहसील कार्यालय भोकर, पंचायत समिती भोकर, उपविभागीय अधिकारी कार्यालय भोकर व गावचावडीच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व प्रसिध्दी दिल्याबाबत पंचनामा करुन या कार्यालयास त्वरीत सादर करावा.
6. दुय्यम निबंधक,मुदखेड यांना कलम 11(1) ची अधिसुचना व अनुसुची 1 प्रतीत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, मौ.मुदखेड ता.मुदखेड स्थीत गट क्र. 3[illegible] मधे कोणत्याही प्रकारचे व्यवहार अथवा नोंदी घेण्यात येऊ नयेत.

13/04/18

उपविभागीय अधिकारी,
भोकर

Scanned by CamScanner

**अधिसूचना**

क्र.2016/म-2/भूसं/एलएनक्यू/उविअभो/प्र.क्र.01
उपविभागीय अधिकारी कार्यालय,भोकर
दिनांक 13 /04/2018

**भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013**

क्र.2016/म-2/भूसं/एलएनक्यू/उविअभो/प्र.क्र.01 ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013(2013 चा 30)याच्याकलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली अधिसुचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण 19/2014/प्र.क्र.77/अ-, दिनांक 19 जानेवारी, 2015(यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 खंड (झेढ अे) असे व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील 500 हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्तअधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन(यात यापुढे जिचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम(1) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.(विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत; आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम 4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही:

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी कारणे नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम(5)अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क(महाराष्ट्र)



Scanned by CamScanner

नियम, 2014(यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे)यांच्या नियम 10 च्या उप नियम (3) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड(छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी,भोकर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

गाव मौ.चिकाळा तालुका मुदखेड जिल्हा नांदेड

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र(हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| 1 | 354 | 0.03 |
| एकूण | | 0.03 |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांवः- भूसंपादन प्रस्ताव मौजे मुदखेड रस्त्याच्या वळण रस्त्यासाठी(रा.मा.क्र.44)मौ.मुदखेड ता.मुदखेड

प्रकल्प कार्याचे वर्णन- दळणवळणा◌ासाठी भूसंपादन करणे

समाजाला मिळणारे लाभ – दळणवळणासाठीच्या पायाभूत सूविधेमधे भर पडत आहे.

(आर्थिक,रोजगार,पायाभूत सूविधा,सोयीसूविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)

**अनुसूची-तीन**

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

लागु नाही

**अनुसूची-चार**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला)सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश.

लागू नाही

**अनुसूची-पाच**

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

भूधारकाचे विस्थापन होत नसल्यामूळे प्रशासक नियुक्ती लागू नाही.

टिप- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी,भोकर ता.भोकर जि.नांदेड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः- 13 /04/2018

ठिकाणः- भोकर

13/04/18

(दीपाली मोतीयेळे)
उपविभागीय अधिकारी,
भोकर

9/C

Scanned by CamScanner